# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in

अधिसूचना

क्रमांक: 2अ/एडीएम/2013/ ८५५

दिनांक: 22 JUL 2013.

विषय : समुपदेशन फेरीमध्ये प्रवेश अॅलॉट झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना शुल्क माफी अनुज्ञेय असल्याबाबत....

प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी , तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमांची पहिल्या दोन केंद्रीभूत प्रवेश फे-यांनंतर तिसरी केंद्रीभूत प्रवेश फेरी समुपदेशन फेरी (Counseling Round) मार्फत प्रवेश करण्यात येतात. समुपदेशन फेरीसाठी उपलब्ध असलेल्या सर्व जागा या आरक्षण विचारात न घेता गुणवत्तानिहाय अॅलॉट करण्यात येतात. समुपदेशन फेरीमध्ये कोणतीही सीट टॅग (मागासप्रवर्ग , डिफेन्स , पीएच इत्यादी ) न दर्शविता या सर्व जागा जनरल सीट म्हणून गणण्यात येतात व त्यानुसारअॅलॉटमेंट करण्यात येते. उमेदवार मागासवर्गीय असतानाही सीट टाईप जनरल नमूद केली जाते मात्र या समुपदेश फेरीमध्ये अॅलॉटमेंट करण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांच्या प्रवर्गानुसार शुल्क माफीची सवलत अनुज्ञेय आहे .

या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणा-या समुपदेशन फेरीमध्ये प्रवेश अॅलॉट होणा-या उमेदवारांना त्यांनी अर्ज निश्चिती करताना नमूद झालेला व त्यानुसार अॅलॉटमेंटमध्येही असलेला प्रवर्ग (category) शुल्क माफीसाठी ग्राहय धरून त्यानुसार शुल्क आकारणी करण्यात यावी.

( डॉ.सुभाष महाजन )

प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई